महाराष्ट्र शासन

क्र. सीईटी ३५१८/प्र.क्र.१३२/१८/शिक्षण-२
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
नवीन मंत्रालय, ९ वा मजला,
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकूल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१.
दिनांक :२४एप्रिल, २०१८.

प्रति,
सचिव,
शुल्क नियामक प्राधिकरण,
खोली क्र.३०५, ३ रा मजला, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, वांद्रा(पु.), मुंबई- ४०० ०५१.

**विषय** : खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयातील पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या संस्थात्मक कोटयाच्या शुल्क निश्चितीबाबत

**संदर्भ** :१) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांचे पत्र क्र. संवशिवसं/ व्यव.कोटा शुल्क/ सीईटीकक्ष/ १-अ/ ३९४०/ २०१८, दि. २०/४/२०१८.
२) आपले पत्र क्र.FRA/ DMER/ २०१८/ ४८७, दि.१८/०४/२०१८.

महोदय,

खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयातील पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या संस्थात्मक कोटयातील जागांचे शुल्क निश्चितीसंदर्भात दि.१९/०३/२०१८ रोजी संपन्न झालेल्या शुल्क नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला होता. सदर बैठकीत ३५ टक्के संस्थात्मक कोटयातील जागांसाठी ३ पट शुल्क आणि १५ टक्के NRI कोटयातील जागांसाठी ५ पट शुल्क आकारण्यास मान्यता देण्यात आली होती.

२. प्राधिकरणाच्या उक्त निर्णयानंतर खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयांच्या AMUPMDC या संघटनेद्वारे ३५ टक्के संस्थात्मक कोटयातील जागांसाठीदेखील ३ पट शुल्काऐवजी ५ पट शुल्क आकारण्यास मान्यता देण्याची मागणी करण्यात येत होती. तसेच सदर मागणी मान्य होईपर्यंत काही खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयांनी पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश करण्यात येऊ नयेत, अशी भूमिका घेतली असून राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षामार्फत पहिल्या फेरीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांना सदर महाविद्यालयांमार्फत प्रवेशही नाकारण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर दि.१७/०४/२०१८ रोजी शासन स्तरावर झालेल्या

बैठकीमध्ये संस्थाचालकांनी ३५ टक्के संस्थात्मक कोटयातील जागांसाठी ४ पट शुल्क आकारण्यास मान्यता मिळाल्यास प्रवेशप्रक्रिया सुरु करण्याची तयारी असल्याचे नमूद केले आहे.

३. पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाची प्रवेशप्रक्रिया ही विहीत वेळापत्रकाप्रमाणे पूर्ण करणे आवश्यक असून संस्थात्मक कोटयाच्या शुल्काबाबत तातडीने निर्णय होणे आवश्यक आहे. सबब, खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयांच्या संस्थाचालकांनी नमूद केल्यानुसार ३५ टक्के संस्थात्मक कोटयातील जागांसाठी ४ पट शुल्क आकारणे योग्य होईल, असे आपणास कळविण्याचे मला शासनाचे निर्देश आहेत. या अनुषंगाने प्राधिकरणाने तातडीने निर्णय घेण्याची विनंती करण्यात येत आहे.

आपला,

(सुरेन्द्र प्र. चानकर)
**शासनाचे उप सचिव**

प्रत,

१. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, खोली क्र.३०५, ३ रा मजला, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, वांद्रा(पु.), मुंबई- ४०० ०५१.

# FEES REGULATING AUTHORITY

Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions
(Regulations of Admission and Fees)
"शिक्षण–नव्हे व्यवसाय –ज्ञान यज्ञ"

Govt. Polytechnic Building305,
3rd Floor, 49, Kherwadi, Bandra (E),
Mumbai - 400 051.

E-mail sssamiti@yahoo.com/fra.govmh@gmail.com
Web: www.sssamiti.org Tel. : 022 - 2647 0463

No. FRA/2018/ 505 Date : 24/4/2018

**Subject taken up with permission of Chair**

**RESOLUTION**

Read: Letter received from the Government of Maharashtra in Medical Education & Drugs Department dated 24/4/2018.

Ref: Decision dated 19/3/2018 about multiple structure fees.

The Government considers it appropriate for the Institutions/Medical Colleges to collect fees with upper limit of four times the regular fees from the students admitted against Institutional/Management quota in Medical PG courses.

It is believed that the Government has legitimate reason and necessary data to suggest increase in the fee structure for Institutional/Management quota students. This Authority does not see any reason not to accede to the suggestion made by the Government.

Accordingly, Office to communicate above decision to the concerned and also place it on the website of this Authority .

**CHAIRPERSON,**
**FEES REGULATING AUTHORITY.**